CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार दि. २९ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ६३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# सरस्वतीने किती शाळा काढल्या? किती लोकांना शिक्षण मिळाले?

## भुजबळांनी पुन्हा एकदा सांस्कृतिक वादाला तोंड फोडले

✔ सुराज्य/सोलापूर

'सरस्वती देवीने किती शाळा काढल्या? किती लोकांना त्यांनी शिक्षण दिले?' असा सवाल करत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा 'विद्येची देवता सरस्वती' या विषयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. 'जर त्यांनी शिक्षण दिले तर मग महात्मा फुलेंना का पाऊल टाकावे लागले? ब्राम्हण समाजात फक्त पुरुषांना शिक्षण दिले जायचे. तेही महिलांना शिक्षण देत नव्हते, म्हणून मी म्हणतो की फक्त सरस्वतीची पूजा का?' असा दुसरा प्रश्न उपस्थित करत ' त्या पूजेत सावित्रीबाई फुलेंना स्थान द्या', अशी मागणी भुजबळांनी नव्या सांस्कृतिकवादाला पुन्हा एकदा तोंड फोडले. ते सोमवारी पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.







भुजबळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो प्रत्येक ठिकाणी असतो याचा आम्हाला आनंद आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्थान आहे. त्याबाबत ही काही दुमत नाही, पण महात्मा फुलेंच्या बाबतीत असे घडत नाही. ते दुर्लक्षित आहेत. त्यामुळे लवकरच भिडे वाड्याची अवस्था सुधारण्याबाबत सरकारशी चर्चा करणार आहोत. या वाड्याच्या सुधारणेसाठी सरकारकडे मागणीदेखील करणार असल्याचे भुजबळांनी सांगितले.

### कोश्यारींना खडसावले

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी छत्रपतींचा, सावित्रीबाईंसह अनेकांचा अपमान करत आहेत. आता रामदेव बाबादेखील महिलांबाबत भयंकर बोलले. त्यावेळी अमृता फडणवीस त्याच कार्यक्रमात उपस्थित होत्या. आज त्या म्हणाल्या की सभ्य भाषेत बोलायला हवे होते. म्हणजे ते असभ्य भाषेत बोलले हे त्यांच्या बोलण्यावरून सिद्ध झाले आहे. यांना काहीही बोलण्याचा कोणी अधिकार दिला? यांचे धाडस कसे होते? आज छत्रपतींचे राज्य असायला हवे. मग बघा यांचे धाडस होते का?, अशा शब्दांत भुजबळांनी कोश्यारींना खडसावले.

### काय चालले आहे पुणे विद्यापीठात?

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आता गणपतीचे अथर्वशीर्ष अभ्यासक्रमात आणले. उद्या शंकर, पार्वती, तीस कोटी देवांचाही अभ्यास सुरू करा. बाकीचे शिक्षण बंद करा. हेच शिकत बसल्यावर कशा नोकऱ्या लागतील. हे सगळे मुद्दाम केले जात आहे. यांच्याविरोधात आवाज उठवावा लागेल. कोणाची परवानगी नसताना हा प्रकार सुरू आहे. काय चालले आहे पुणे विद्यापीठात? असा सवाल भुजबळांनी यावेळी उपस्थित केला.

### अन्यथा आंदोलन

सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांचे नाव आपण अभिमानाने घेतो. पण त्यांनी जिथे शिक्षणाचे मोठे कार्य उभारले; त्या भिडेवाड्याची आजची अवस्था वाईट आहे. मी आजदेखील मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना त्यासंदर्भात बैठक घ्यायला सांगितले आहे. त्या दोघांनीही लवकरच पुण्यात यासंदर्भात बैठक घेऊ असे सांगितले आहे. थोडे दिवस वाट बघू, अन्यथा आंदोलन करावे लागणार आहे, असा इशारा छगन भुजबळांनी दिला.

## ग्रामपंचायत निवडणूक : पहिल्या दिवशी सरपंचपदासाठी ३० तर सदस्यपदांसाठी ४७ अर्ज

✔ सोलापूर : जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सोमवार २७ पासून सुरुवात झाली. पहिल्या दिवशी सरपंचपदासाठी ३० व सदस्यपदांसाठी ४७ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

उमेदवारी अर्ज ऑनलाईन भरून त्याची प्रत सादर करायची असल्याने पहिल्या दिवशी शहरातील दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यातील केंद्रांवर इच्छुकांची तुरळक गर्दी होती. सरपंचांनी निवड थेट जनतेतून होणार असल्याने गावागावांत भावकी अन् गावकीच्या राजकारणाला वेग आला आहे. शुक्रवार २ डिसेंबरपर्यंत सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. मंगळवार २९ रोजी चंपाषष्ठी खंडोबा नवरात्र असल्याने गुरुवार १ डिसेंबर सर्वाधिक उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.




दक्षिण सोलापूर तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींसाठी नॉर्थकोट कॉलेजमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आहे. तर, उत्तर तालुक्यासाठी तहसील कार्यालयामध्ये सोय करण्यात आलेली आहे.

सोमवारी पहिल्या दिवशीच मार्डी येथील सरपंचपदासाठी राष्ट्रवादीच्या महिला जिल्हा कार्याध्यक्ष सुवर्णा झाडे यांनी आपल्या समर्थकांसह अर्ज दाखल केला.

## आरोपीने चालत्या गाडीत पोलिसाचा गळा आवळला

✔ बीड : बीडमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. खुनातील आरोपीला ताब्यात घेऊन नेकनूर पोलीस ठाण्याकडे घेऊन येत असताना आरोपींने चालकाचा गळा दाबून पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस गाडीचा अपघात होऊन पोलीस अधिकारी मुस्तफा शेख यांच्यासह अन्य पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. खुनातील आरोपी असलेल्या रोहिदास निर्मळ याला पोलीस ठाण्यात घेऊन जात असताना त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी ही घटना घडली. सध्या जखमी पोलिसांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## आफताब बसलेल्या पोलीस व्हॅनवर हल्ला

✔ नवी दिल्ली : संपूर्ण देशाला हादरवून टाकणाऱ्या श्रद्धा वालकर हत्या प्रकरणातील आरोपी आफताब अमीन पूनावाला याच्यावर सोमवारी दिल्लीत हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. सध्या दिल्ली पोलिसांकडून आफताबची पॉलिग्राफ टेस्ट सुरू आहे. ही टेस्ट झाल्यावर आफताबला पुन्हा तुरुंगाच्या दिशेने नेले जात होते. पोलिसांच्या गाडीतून त्याला तुरुंगाकडे नेले जात असताना हिंदू सेनेच्या कार्यकर्त्यांनी आफताब बसलेल्या पोलीस गाडीवर हल्ला केला.

## महसूल कर्मचारी पतसंस्थेवर तलाठी संघटनेची बाजी

### सिध्देश्वर पॅनेलला फक्त सहा जागा, गायगवाडचा पराभव






✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न अखेर फसल्याने झालेल्या निवडणुकित पतसंस्थेवर तलाठी संघटनेची बाजी मारली आहे. तलाठी संघटनेच्या श्री स्वामी समर्थ पॅनेलचे ९ उमेदवार तर महसूल कर्मचारी पॅनेल श्री सिद्धेश्वर पॅनेलचे ६ उमेदवर विजयी झाले आहेत. महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तथा सिद्धेश्वर पॅनेल प्रमुख शंतनु गायकवाड यांचा धक्कादायक पराभव झाला आहे.

११ कोटी ठेवी असलेली पतसंस्था आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी दोन पॅनेल आमने सामने आले होते. ११ तालुक्यांतील महसूल कर्मचारी, ६ प्रांतकार्यालये, शिपाई, वाहनचालक, महसूल सहायक, अव्वल कारकून, नायब तहसीलदार हे सभासद मतदान केले एकूण ८१५ सभासद आहेत. २७ नोव्हेंबर रोजी नु. म. वि. प्रशालेत सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान मतदान झाले सायंकाळी उशिरा निकाल जाहीर झाला त्यामध्ये तलाठी संघटनेच्या श्री स्वामी समर्थ पॅनेलचे ९ उमेदवार तर महसूल कर्मचारी पॅनेल श्री सिद्धेश्वर पॅनेलचे ६ उमेदवर विजयी झाले. जनरलच्या दहा जागेसाठी दोन्ही पॅनेलचे प्रत्येकी दहा आणि तीन अपक्ष असे २३ उमेदवार निवडणूक आखाड्यात होते. यामध्ये तलाठी पॅनलचे सर्वसाधारण गटातून सहा उमेदवार विजयी झाले तर महसूल कर्मचारी पॅनलचे सर्वसाधारण गटात चार उमेदवार विजयी झाले तलाठी पॅनलच्या दोन्ही महिला प्रतिनिधी विजयी झाल्या आहेत मात्र महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शंतनुराव गायकवाड यांचा मोठा पराभव झाला आहे.

#### तलाठी संघटनेचे विजयी उमेदवार मिळलेले मते

सदिक काझी (३९३), रियाज भाईजान (३८९), शरद खंडागळे (३८४), बाबा कांबळे (३७१), ज्ञानेश्वर बोराडे (३७४), भीमाशंकर भुर्ले (३७३), सुनिता ढोणे (४०१), वर्षा बरबडे (४१३), कुमाररवी राजवाडे (३९२)

#### महसूल कर्मचारी संघटनेचे विजयी उमेदवार मिळालेली मते

संदीप लटके (३८५), जितेंद्र कदम (३८२), बसवराज सलीमठ (३९४), पंकज राठोड (४००), जगदेवअप्पा धनुरे (३७८)

## पत्नीच्या खून प्रकरणी जन्मठेप भोगणाऱ्या कैद्याची प्रियकराच्या खून प्रकरणातून निर्दोष सुटका

### पहिल्या खुनात जन्मठेपेची शिक्षा भोगली; पत्नीच्या खुनात जन्मठेप भोगताना केला तिसरा खून

✔ सुराज्य/सोलापूर

पहिल्या खून प्रकरणात झालेली जन्मठेपेची शिक्षा भोगून आल्यानंतर चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा खून केल्याप्रकरणी पुन्हा जन्मठेपेची शिक्षा भोगताना, कोरोना काळात घरी आल्यानंतर तिसरा खून करणाऱ्या कैद्याची सबळ पुराव्याअभावी जिल्हा न्यायाधीश डॉ. शब्बीर औटी यांनी निर्दोष मुक्तता केली.

अमोगसिद्ध भीमा पुजारी (वय ६३ रा.वडापूर ता.दक्षिण सोलापूर) असे या खटल्यातील निर्दोष सुटलेल्या कैद्याचे नाव आहे. या खटल्यातून तो निर्दोष सुटला असला तरी पत्नीच्या खून प्रकरणात तो जन्मठेपेची शिक्षा भोगत असल्यामुळे तो तुरूंगाबाहेर येणार नाही.

या खटल्याची पार्श्वभूमी अशी, आरोपी अमोगसिद्ध पुजारी याला त्याची पत्नी मंदोदरी पुजारी हिचे गावातील ज्ञानदेव नागणसुरे याच्याबरोबर अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. त्या कारणावरून त्याने ३० मार्च२००९ रोजी पत्नीच्या डोक्यात दगड टाकून खून केला होता.या प्रकरणात जिल्हा न्यायालयाने त्याला २६ सप्टेंबर २०११ रोजी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती.त्याप्रमाणे आरोपी




हा पैठण येथील कारागृहात शिक्षा भोगत होता. कोरोना कालावधींत त्याला कारागृह प्रशासनाने बाँडवर सोडले होते. त्यामुळे तो आपल्या वडापूर येथे मूळ गावात आला होता.

कारागृहातून आल्यानंतर आरोपी हा त्याच्या पत्नीबरोबर ज्ञानदेव यांचे संबंध असल्यामुळे त्याचा खून करणार असल्याचे बोलत होता. दि.१८ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारच्या सुमारास वडापूर ते विंचूर रस्त्यावरील बिराजदार यांच्या उसाच्या पिकात आरोपी याने ज्ञानदेव प्रभू नागणसुरे (रा.वडापूर) यांचा तीक्ष्ण शस्त्राने खून केला होता.

या घटनेची फिर्याद मयताचा मुलगा दत्तात्रय नागणसुरे यांनी मंद्रुप पोलिसात दाखल केली होती. त्याप्रमाणे मंद्रूपच्या पोलिसांनी पुजारी याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. तत्कालीन फौजदार अमितकुमार करपे यांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात सरकार तर्फे ६ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदाराच्या साक्षींमध्ये विसंगती असल्यामुळे आरोपीला निर्दोष सोडावे असा युक्तिवाद करण्यात आला होता. तो ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषमुक्त ठरवले. या खटल्यात आरोपींतर्फे ॲड. रामदास वागज तर सरकार तर्फे ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी काम पाहिले.

#### आरोपीच्या खुनाचा घटनाक्रम

दि.२५ मे १९९१ रोजी धोंडिबा यल्लू करपे(रा.अंत्रोळी ता.दक्षिण सोलापूर) यांचा खून झाला होता. या प्रकरणात न्यायालयाने आरोपी अमोगसिद्ध पुजारी याला दि.१६ जून १९९४ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. ती शिक्षा भोगून आल्यानंतर त्याने आपली पत्नी मंदोदरी पुजारी हिचा दि.३० मार्च २००९ रोजी खून केला होता. या प्रकरणात न्यायालयाने त्याला दि.२६ सप्टेंबर २०११ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. ती शिक्षा भोगत असताना कोरोना कालावधीत तो सुट्टीवर आला होता. यादरम्यान त्याने दि.१८ ऑगस्ट २०२१ रोजी कोयत्याने मारून ज्ञानदेव नागणसुरे (रा. वडापूर ता.दक्षिण सोलापूर) यांचा खून केला होता.

#### फाशीच्या शिक्षेची होती चर्चा

जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना आरोपीने पुन्हा खुनासारखा गंभीर गुन्हा केला तर त्याला फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे आरोपीला फाशी होणार असे गृहीत धरण्यात आले होते. मात्र सबळ पुराव्याअभावी त्याची निर्दोष मुक्तता झाली. मात्र आरोपी हा आपल्या पत्नीचा खून केल्याप्रकरणी पुढील शिक्षा भोगत असल्याचे आरोपीच्या वकिलाकडून सांगण्यात आले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कॉफी करू की कोल्ड कॉफी?

| कल्याण |
|---|
| ---------- |

| मेन बाजार |
|---|
| ---------- |

## राजकीय अस्थिरतेमुळे इच्छुकांमध्ये वाढली अस्वस्थता

### लक्ष्य २०२२ वर फेरले पाणी; तारखेकडे लक्ष देण्याशिवाय पर्याय नाही

✔ सोलापूर : निवडणुकीच्या रणधुमाळीसाठी जवळपास वर्षापासून इच्छुक मंडळी गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. 'लक्ष २०२२'चा नारा देत यंदा महापालिकेत एंट्री करण्याची जोरदार तयारी अनेकांनी केली होती. परंतु, त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असून आता निवडणूक कधी होणार? यावरच लक्ष देण्याची वेळ त्यांच्यावर आली.

राज्यातील राजकीय अस्थिरतेमुळे निवडणुकीबाबत अनिश्चितता वाढल्यानंतर माजी नगरसेवक आणि इच्छुकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. सोलापूर महापालिकेची मुदत मार्च महिन्यामध्ये संपली. त्यानंतर पालिकेवर प्रशासक राज आहे. महाआघाडीची सत्ता असताना त्यांनी तीन सदस्य पद्धतीने निवडणुका घेण्याची आणि महापालिकेतील सदस्य संख्या वाढवण्याचा निर्णयही घेतला. त्यामुळे सोलापूर महापालिकेची नगरसेवकांची संख्या १०२ वरून ११३ पर्यंत पोहोचली. त्यानंतर ओबीसी आरक्षणाशिवाय आणि त्यानंतर पुन्हा ओबीसी आरक्षणासह सोडतही काढण्यात आली. त्यानंतर इच्छुकांनी जोरदार तयारीही सुरू केली होती. मात्र जून महिन्यामध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिंदे आणि फडणवीस सरकार आले आणि महाआघाडी सरकारची सर्व प्रक्रिया त्यांनी बासनात गुंडाळली. शिंदे-फडणवीस सरकारने नगरसेवक संख्या वाढवण्याचा निर्णय रद्द केला. याशिवाय तीन सदस्य ऐवजी चार सदस्य पद्धतीने निवडणूक घेण्याचा निर्णय जवळपास निश्चित केला. यावर महाआघाडी सरकारने आक्षेप घेतला आहे त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.



**नव्या प्रक्रियेला तीन-चार महिन्याचा कालावधी :** शिंदे फडणवीस सरकारने आता गेल्या आठवड्यात पुन्हा नव्याने प्रभाग रचना करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत. नवीन प्रभाग रचना, त्यावर हरकती आणि सूचना, आरक्षण सोडत प्रक्रिया करणे याला जवळपास तीन ते चार महिन्यांचा कालावधी जाणार आहे. त्यामुळे निवडणुका कधी होणार हा प्रश्न कायम आहे.

**न्यायालयाची तारीख पे तारीख :** शिंदे-फडणवीस सरकारने महाआघाडीने केलेली प्रभाग रचना तसेच तीन सदस्यीस पद्धत बदलण्याचा निर्णय घेतला. याविरोधात राष्ट्रवादी पक्ष न्यायालयात गेला आहे. मात्र सतत या प्रकरणावर तारीख पे तारीख मिळत आहे. सोमवारीही यावर सुनवणी झाली, पुढील आठवड्याची तारीख मिळाली आहे.

CMYK